**लोकसभेच्या एप्रिल-मे,२०१९ मध्ये होणाऱ्या**
**आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या कालावधीतील**
**महाराष्ट्र विधानमंडळाच्या समित्यांच्या बैठका....**

# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**परिपत्रक क्रमांक : ५०६४/ड-३(समिती समन्वय)**

विधान भवन, मुंबई

दिनांक : ११ मार्च, २०१९

**संदर्भ :- या सचिवालयाचे परिपत्रक क्र.२५७८१/म.वि.स./ड-३(समिती समन्वय), दि.१६ ऑक्टोबर, २०१८**

**:: परिपत्रक ::**

मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या निदेशानुसार या सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्षांना कळविण्यात येते की, भारत निवडणूक आयोगाने जाहीर केल्याप्रमाणे लोकसभेसाठी महाराष्ट्रातील मतदान दिनांक ११, १८, २३ व २९ एप्रिल, २०१९ रोजी अशा चार टप्प्यात होणार आहे. मतदानाच्या पहिल्या टप्प्यासाठी दिनांक १८ मार्च, २०१९ रोजी, दुसऱ्या टप्प्यासाठी दिनांक १९ मार्च, २०१९ रोजी, तिसऱ्या टप्प्यासाठी दिनांक २८ मार्च, २०१९ रोजी व चौथ्या टप्प्यासाठी दिनांक २ एप्रिल, २०१९ रोजी अधिसूचना काढण्यात येणार आहेत. लोकसभेच्या सदर निवडणुकीसाठी दिनांक १० मार्च, २०१९ रोजीपासून निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आदर्श आचारसंहिता लागू राहणार असल्याने आचारसंहितेच्या कालावधीत महाराष्ट्र विधानमंडळाच्या समित्यांच्या बैठका आयोजित करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(१) **महाराष्ट्र विधानमंडळ समित्यांच्या दिनांक १८ मार्च, २०१९ रोजीपर्यंत विधान भवन, मुंबई येथे केवळ अंतर्गत कामकाजाचा समावेश असेल अशाच बैठका घेण्याबाबत दक्षता घेण्यात यावी.** सदर बैठकींसाठी मंत्रालयीन विभागांचे सचिव तसेच इतर संबंधित शासकीय अधिकाऱ्यांना साक्ष इ.साठी शक्यतो पाचारण करण्यात येऊ नये.

(२) राज्यातील शासकीय यंत्रणा दिनांक १८ मार्च, २०१९ पासून निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निवडणूकीच्या कामकाजात व्यस्त राहणार आहे. **यास्तव महाराष्ट्र विधानमंडळाच्या समित्यांनी दिनांक १८ मार्च, २०१९ पासून लोकसभा निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीत विधान भवन, मुंबई येथे अथवा राज्यात इतरत्र कोठेही बैठका आयोजित करण्यात येऊ नयेत.**

..२/-

**(३)** राज्यातील दुष्काळ सदृष्य परिस्थिती विचारात घेता विधानमंडळ समित्यांच्या राज्यांतर्गत व राज्याबाहेरील दौऱ्यासंदर्भात मा.पीठासीन अधिकाऱ्यांनी घातलेले निर्बंध यापूर्वीचे संदर्भाधीन परिपत्रक क्रमांक २५७८१/म.वि.स./ड-३(समिती समन्वय), दिनांक १६ ऑक्टोबर, २०१८ अन्वये निर्गमित केलेले असून उक्त आदेशांचा अंमल सुरु असल्याने समित्यांच्या दौऱ्यासंदर्भात वेगळे आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता नाही.

मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे उपरोक्त निदेश समित्यांच्या बैठका ठरविताना समितीच्या निदर्शनास आणून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

**( शिवदर्शन साठ्ये )**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**<u>प्रतिलिपी</u> :-**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
२) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा व मा.विरोधी पक्ष नेते (विधानसभा/विधानपरिषद) यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
३) सचिव (कार्यभार) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
४) विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित
५) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
६) पध्दती विश्लेषक, संगणक कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय